# इंदिरा गांधी यांना अभिवादन

कोल्हापूर : भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी शिवाजी विद्यापीठात आदरांजली वाहण्यात आली. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव एम. पी. कदम, विलास सोयम, हिंदी विभागातील सुषमा चौगुले, अक्षय भोसले यांच्यासह कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

लोकमत

# पुणे विद्यापीठाची विजयी सलामी

## कुलगुरु चषक टी-२० : 'जामिया मिलिया', 'जम्मू'चीही आगेकूच

लोकमत न्यूज नेटवर्क

### आजचे सामने

| सकाळचे सत्र (सकाळी ८.३० वा.) | दुपारचे सत्र (दुपारी १ वा.) |
|---|---|
| ◆ पंजाब विद्यापीठ, चंदिगढ वि. महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक | ◆ जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, दिल्ली वि. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |
| ◆ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वि. केंद्रीय विद्यापीठ, जम्मू | ◆ जम्मू विद्यापीठ, जम्मू वि. महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर |
| ◆ दीनदयाल उपाध्याय, गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर वि. लाला लजपतराय पशुविज्ञान विद्यापीठ, हिस्सार | ◆ हिमाचल प्रदेश विद्यापीठ, सिमला वि. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी |

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारपासून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक स्पर्धेस प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी झालेल्या बाद फेरीच्या सामन्यांत नवी दिल्लीचे जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, जम्मू विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक, पंजाब विद्यापीठ, चंदीगढ आणि दीनदयाल उपाध्याय विद्यापीठ, गोरखपूर या विद्यापीठांच्या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले.

पहिल्या सामन्यात नवी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाने पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना संघावर ९६ धावांनी मात केली. यामध्ये जामिया मिलियाच्या संघाने २० षटकांत ५ बाद २३२ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना लुधियाना संघाने सर्वबाद १३६ धावांपर्यंत मजल मारली. जामिया मिलियाच्या संघाचा अर्धशतकवीर बाहीद मोहम्मद 'सामनावीर' ठरला. जम्मू विद्यापीठाने मुंबई विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. मुंबई विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी बाद १२४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल जम्मू विद्यापीठाने ६ गड्यांच्या मोबदल्यात १८.३ षटकांत हे आव्हान गाठले. या संघाकडून नाबाद ४३ धावा करणारा व २ बळी घेणारा राजेश मल्होत्रा 'सामनावीर' ठरला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यातील सामना पुणे विद्यापीठाने ३७ धावांनी जिंकला. पुणे विद्यापीठाचा संघ प्रथम फलंदाजी करताना जळगावच्या शशिकांत शिरसाटच्या हॅट्ट्रिकमुळे १५.५ षटकांत ८५ धावांवर आटोपला. गोलंदाजीत पुणे विद्यापीठाकडून सचिन सुर्वे याने ३, विनोद नरके, मोनिष गायकवाड यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. जळगावचा संघ अवघ्या ४८ धावांतच तंबूत परतला. पुणे संघाचा दिनेश वाल्मीकी 'सामनावीर' ठरला.

रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठावर ६९ धावांनी विजय मिळविला. रोहटक संघाच्या ११८ धावांचा पाठलाग करताना राहुरीचा संघ अवघ्या ४९ धावांत गारद झाला. रोहटकचा नरेंद्र कुमार 'सामनावीर' ठरला. चंदीगढच्या पंजाब विद्यापीठाने नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा ७ गडी राखून पराभव केला. नागपूरचे १०६ धावांचे आव्हान पंजाब विद्यापीठाने १४.४ षटकांत पूर्ण करताना ११० धावा केल्या. पंजाब विद्यापीठाच्या सूर्यकांत यांनी २.३ षटकांत १४ धावा देत ४ बळी घेताना स्पर्धेतील पहिली हॅट्ट्रिक नोंदविली. तो 'सामनावीर' ठरला. गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाने जम्मू केंद्रीय विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. सामन्यात जम्मू विद्यापीठाच्या १४७ धावांचे आव्हान गोरखपूर संघाने ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले.

# पुणे, जम्मू, रोहतकची प्रतिस्पर्ध्यांवर मात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक स्पर्धेत पहिल्या दिवशी झालेल्या बाद फेरीच्या सामन्यांत नवी दिल्लीच्या जामीया मीलिया इस्लामीया विद्यापीठ, जम्मू विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक, पंजाब विद्यापीठ, चंदीगड आणि दीनदयाल उपाध्याय विद्यापीठ, गोरखपूर या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले.

**कुलगुरू चषक क्रिकेट**

दिवसभरातला सर्वाधिक प्रेक्षणीय सामना नवी दिल्लीच्या जामिया मीलिया आणि पंजाब कृषी विद्यापीठ संघात झाला. काल उद्‌घाटनाच्या सत्रात झालेल्या प्रदर्शनीय सामन्यात तुफान फटकेबाजी करणाऱ्या जामिया मीलियाच्या संघाने पंजाब कृषी विद्यापीठाविरुद्ध खेळताना २० षटकांत ५ बाद २३२ धावांचा डोंगर रचला. लुधियानाच्या संघाला सर्व बाद १३६ धावांत गुंडाळले. दुपारच्या सत्रातील अन्य सामन्यांमध्ये जम्मू विद्यापीठाने मुंबई विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. मुंबई विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी बाद १२४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल जम्मू विद्यापीठाने ६ गड्यांच्या मोबदल्यात १८.३ षटकांत हे आव्हान गाठले. जम्मूच्या दीपक कुमारने ५८ धावा केल्या. सावित्रीबाई फुले विद्यापीठ आणि जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतील सामना पुणे विद्यापीठाने ३७ धावांनी जिंकला. तत्पूर्वी, सकाळच्या सत्रात रोहतकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठावर ६९ धावांनी विजय मिळवला.

पंजाब विद्यापीठाने नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा ७ गडी राखून पराभव केला. नागपूरचे १०६ धावांचे आव्हान पंजाब विद्यापीठाने १४.४ षटकांत पूर्ण करताना ११० धावा केल्या. पंजाब विद्यापीठाच्या सूर्यकांत यांनी २.३ षटकांत १४ धावा देत ४ बळी घेताना स्पर्धेतील पहिली हॅट्ट्रिक नोंदवली. तोच सामनावीर ठरला. गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाने जम्मू केंद्रीय विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. अखेरच्या चेंडूपर्यंत अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या या सामन्यात जम्मू विद्यापीठाच्या १४७ धावांचे आव्हान गोरखपूर संघाने ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. गोरखपूरकडून ३६ धावा करून विजयात महत्त्वाची कामगिरी बजावणारा सुरेंद्र यादव सामनावीर ठरला.

# कोल्हापुरात परदेशी विद्यार्थ्यांचा ओढा वाढला!

## शैक्षणिक गुणवत्तेवर शिक्कामोर्तब; विद्यार्थ्यांसाठी लवकरच नवीन वसतिगृह

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय पातळीवर वाढलेली प्रतिष्ठा, परदेशी विद्यार्थ्यांसाठीचे शैक्षणिक धोरण, कोल्हापूर शहराचा नावलौकिक, शैक्षणिक शुल्क, राहण्याच्या सुविधेबरोबरच दळणवळण सुविधांच्या उपलब्धतेमुळे कोल्हापुरात परदेशी विद्यार्थ्यांचा शिक्षणासाठी येण्याचा ओढा वाढला आहे. यामुळे येथील शैक्षणिक गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाले आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठांतर्गत सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे २९० हून अधिक महाविद्यालये आहेत. विद्यापीठात परदेशी विद्यार्थ्यांची शिकण्याची सोय असल्याने पदवी, पदव्युतर पदवी आणि पीएच.डी., संशोधनासाठी परदेशी विद्यार्थी येत आहेत. यात प्रामुख्याने इराण, इराक, बांगला देश, मोझांबिक, झिम्बाब्वे, मॉरिशस, केनिया, गिनी बिसाऊ यासह आफ्रिकेतील देशांचा समावेश आहे. विद्यापीठ कॅम्पसमध्ये विविध अभ्यासक्रमासाठी सध्या ५४ तर संलग्नित महाविद्यालयात १०० हून अधिक परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठात परदेशी विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय वसतिगृहात सोय केली आहे.

विद्यापीठात २०१७-१८ मध्ये मानसशास्त्र, कॉमर्स, प्राणीशास्त्र, जीवरसायनशास्त्र, संगणक अभियांत्रिकी, संगणक विज्ञान, जैव तंत्रज्ञान विषयातील पीएच.डी.साठी (२) व शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये (११) परदेशी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. पदव्युतर पदवीसाठी २०१८-१९ मध्ये (८) व २०१९-२० या शैक्षणिक वर्षात २१ परदेशी विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. पदवी अभ्यासक्रमासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. अभियांत्रिकी व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी नियम, अटीच्या मर्यादा असल्याने ही परदेशी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अडचणी येत आहेत. विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स सेलच्या वतीने विद्यापीठ, अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांना पत्र पाठविण्यात आले आहे. परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशबाबत अडचणी उद्‌भवू नये, सुलभता यावी यासाठी विद्यापीठ स्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

### लवकरच दुसरे आंतरराष्ट्रीय वसतिगृह

विद्यापीठात आंतरराष्ट्रीय वसतिगृहात २४ विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्यात आली आहे. मात्र, विद्यार्थ्यांची संख्या पाहता ते अपुरे पडत आहे. यासंदर्भात इंटरनॅशनल अफेअर्स सेलने प्रशासनास नवीन वसतिगृह सुरू करण्याबाबत प्रस्ताव पाठिवला असून त्यास तत्त्वत: मंजुरी मिळाली आहे. लवकरच परदेशी विद्यार्थ्यांसाठी दुसरे नवीन वसतिगृह सुरू करण्यात येणार आहे.

> विद्यापीठाकडे गुणवत्ता असेल तर जगाच्या कोनाकोपऱ्यातील कोणत्याही भागातील विद्यार्थी अनेक बाबींवर मात करीत शिक्षणासाठी प्रयत्न करतो. शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रतिष्ठेमुळे परदेशी विद्यार्थी आकर्षित होत असून आगामी काळात त्यांची संख्या निश्चित वाढेल. परदेशी विद्यार्थ्यांमुळे सांस्कृतिक व्यासपीठ निर्माण होत आहे.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# पुणे, जामिया मिलिया, जम्मू विद्यापीठांची विजयी सलामी

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलावर मंगळवारपासून सुरू झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ 'कुलगुरू चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या बाद फेरीत नवी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, जम्मू विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक, पंजाब विद्यापीठ, चंदीगढ आणि दीनदयाल उपाध्याय विद्यापीठ, गोरखपूर या विद्यापीठांच्या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवत विजयी सलामी दिली.

जामिया मिलियाच्या संघाने २० षटकांत ५ बाद २३२ धावा केल्या. उत्तरादाखल लुधियानाचा संघ १३६ धावांत गुंडाळला. जामिया मिलियाच्या संघाच्या वाहीद मोहम्मदने अवघ्या १६ चेंडूंत ६० धावा करत सामनावीरचा किताब पटकाविला. त्याला आदिल अहमद आणि अखलाख मोहम्मह यांनी प्रत्येकी ५८ धावांची साथ मिळाली.

**१७ वी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा**

दुसऱ्या सामन्यात जम्मू विद्यापीठाने मुंबई विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. मुंबई विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी बाद १२४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल जम्मू विद्यापीठाने ६ गड्यांच्या मोबदल्यात १८.३ षटकांत हे आव्हान गाठले. जम्मूच्या दीपक कुमारने ५८ धावा केल्या. या संघाकडून नाबाद ४३ धावा करणारा व २ बळी घेणारा राजेश मल्होत्रा सामनावीर ठरला.

जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पुणे विद्यापीठावर ३७ धावांनी मात केली. पुणे विद्यापीठाने १५.५ षटकांत ८५ धावांवर आटोपला. पुणे संघाकडून सर्वाधिक २२ धावा करणारा दिनेश वाल्मिकी सामनावीर ठरला. रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठावर ६९ धावांनी विजय मिळविला. रोहटक संघाच्या ११८ धावांचा पाठलाग करताना राहुरीचा संघ अवघ्या ४९ धावांत गारद झाला. या सामन्यात ११ धावांसह ३ धावांत ५ बळी घेणारा रोहटकचा नरेंद्र कुमार सामनावीर ठरला.

चंदीगढच्या पंजाब विद्यापीठाने नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा ७ गडी राखून पराभव केला. नागपूरचे १०६ धावांचे आव्हान पंजाब विद्यापीठाने १४.४ षटकांत पूर्ण करताना ११० धावा केल्या. पंजाब विद्यापीठाच्या सूर्यकांत यांनी २.३ षटकांत १४ धावा देत ४ बळी घेताना स्पर्धेतील पहिली हॅटट्रीक नोंदविली, हे या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले. सूर्यकांतच सामनावीर ठरला. गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाने जम्मू केंद्रीय विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. जम्मू विद्यापीठाच्या १४७ धावांचे आव्हान गोरखपूर संघाने ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. गोरखपूरकडून ३६ धावा करून विजयात महत्त्वाची कामगिरी बजावणारा सुरेंद्र यादव 'सामनावीर ठरला.

20 NOV 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ परिसरात

# ३१ कोटी लिटर पाणीसाठा

### जलयुक्त विद्यापीठ योजनेचे धवल यश

### नोव्हेंबरच्या मध्यावरही जलसाठे तुडुंब

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेल्या जलयुक्त विद्यापीठ योजनेला मोठे यश मिळत आहे. नोव्हेंबर महिन्यांच्या मध्यावरही विद्यापीठातील सर्व जलसाठे तुडुंब भरले असून, सध्या या जलसाठ्यांमध्ये ३१ कोटी लिटर पाणी साठविण्यात आले आहे. त्याचबरोबर या परिसरातील भूजल पातळीमध्ये मोठी वाढ झाली आहे.

पाणीटंचाईला तसेच महापालिकेकडून पिण्याचे पाणी विकत घेणाऱ्या विद्यापीठाने जलयुक्त विद्यापीठ ही अभिनव योजना हाती घेतली. गेल्या तीन वर्षांपासून योजनेला मोठे यश मिळत आहे. विद्यापीठातील पाणीसाठ्यात यामुळे वाढ झाली. मात्र, येथेच न थांबता प्रशासनाने आपले काम सुरूच ठेवले. प्रतिवर्षी नवीन जलसाठे निर्माण करणे, जलसाठ्यांचे पुनर्जीवन करणे, परिसरातून बाहेर वाहून जाणारे पाणी अडवून ते मुरविणे आदींसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

यावर्षी अतिवृष्टी झाली. या पावसाने महापूर आला. मात्र, विद्यापीठाने या पावसाळ्यात पाणी साठवण्याकडे विशेष लक्ष दिले. कॅम्पसवरील जलसाठ्यांची साठवण क्षमता आजघडीला सुमारे ३१ कोटी लिटरइतकी वाढवण्यात यश आले आहे. कॅम्पसवर तीन धरणांसह दहा शेततळी आणि नऊ विहिरी आहेत. पूर्वीच्या जलशुद्धीकरण ▸▸ पान २ वर




कोल्हापूर : नोव्हेंबर महिन्याच्या मध्यावरही तुडुंब भरलेला शिवाजी विद्यापीठातील संगीतशास्त्र विभाग परिसरातील तलाव. (छाया : पांडुरंग पाटील)

### जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह राणा यांनी केले कौतुक

जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह राणा यांनी विद्यापीठास २७ मार्च रोजी भेट दिली होती. संगीतशास्त्र विभागाशेजारचा तलाव, जलशुद्धीकरण प्रकल्प, त्याशेजारील विहीर, शिंदे विहीर, सुतार विहीर, शेजारील शेततळी हे सर्व पाहिले. यावेळी त्यांनी विद्यापीठाने राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले, त्याचबरोबर शिंदे विहीर पाहात असताना आडवे पाण्याचे झरे ही पाण्याची पातळी चांगली वाढल्याचे लक्षण आहे, असे उद्गार काढले.

### सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे यश



विद्यापीठाने सातत्यपूर्ण केलेल्या प्रयत्नाचे हे मोठे यश आहे. विद्यापीठ अजूनही जलसाठे वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहे. बाहेर वाहून जाणारे जास्तीत जास्त पाणी विद्यापीठ परिसरातच अडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहे.

-डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2019
पुण्यनगरी

# विद्यापीठ परिसरात ३१ कोटी लिटर पाणीसाठा

(पान १ वरून)
प्रकल्पाच्या जोडीला ६ हजार लिटर प्रति तास इतक्या क्षमतेचा आर.ओ. प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पाद्वारे सर्वांना समान दर्जाचे शुद्ध पाणी पुरविले जाते. परिणामी कॅम्पसवरील विद्यार्थ्यांतील पाण्यापासून होणाऱ्या आजारांचे प्रमाण गेल्या तीन वर्षांत लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. या जलयुक्त मोहिमेमुळेच महापुराच्या काळात कोल्हापूर शहराला पंधरा दिवसांहून अधिक काळ दररोज शुद्ध पाण्याचा अखंडित पुरवठा करणे विद्यापीठाला शक्य झाले. या काळात जवळपास एक लाख लिटर पाणी विद्यापीठातर्फे महापालिकेला देण्यात आले; तर सर्वसामान्य नागरिकही या काळात पिण्याचे पाणी भरण्यासाठी येथे गर्दी करत होते. पुढील काळातही जलसाठे वाढवण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून प्रयत्न केले जाणार आहेत.

## डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा पुढाकार

सोमवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कारकिर्दीतील अखेरचा वर्धापनदिन पार पडला. यामध्ये केलेल्या भाषणात त्यांनी आपल्या कारकिर्दीत केलेल्या अविस्मरणीय कामांचा उद्घोष केला. यामध्ये त्यांनी जलयुक्त विद्यापीठ या उपक्रमाचा ठळकपणे उल्लेख केला. त्याचबरोबर उपक्रमाच्या यशस्वीतेमध्ये डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा पुढाकार असल्याचे सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2019
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात इंदिरा गांधी यांना अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव एम. पी. कदम, विलास सोयम, हिंदी विभागातील सुषमा चौगुले, अक्षय भोसले आदी उपस्थित होते.

# ‘जामिया’, ‘जम्मू’, पुणे विद्यापीठ विजयी

## आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० स्पर्धा : ‘दयानंद’, ‘पंजाब’ विद्यापीठांचीही प्रतिस्पर्ध्यांवर मात

**कोल्हापूर, ता. १९ : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक टी-२०’ स्पर्धेत आज झालेल्या पहिल्या दिवशीच्या बाद फेरीच्या सामन्यांत नवी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, जम्मू विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक, पंजाब विद्यापीठ, चंदीगढ आणि दीनदयाल उपाध्याय विद्यापीठ, गोरखपूर या विद्यापीठांच्या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले.**

नवी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ विरुद्ध पंजाब कृषी विद्यापीठ (लुधियाना) यांच्यात झालेला सामना रोमहर्षक ठरला. जामिया मिलियाच्या संघाने २० षटकांत ५ बाद २३२ धावांचा डोंगर रचला. लुधियानाच्या संघ सर्व बाद १३६ धावाच करू शकला. जामिया मिलियाच्या संघाच्या वाहीद मोहम्मदने १६ चेंडूंत ६० धावा केल्या. त्याला आदिल अहमद आणि अखलाख मोहम्मह यांनी प्रत्येकी ५८ धावा करून उत्तम साथ दिली. या धावांमुळे लुधियाना संघावर त्यांनी ९६ धावांनी मात केली.

दुपारच्या सत्रातील सामन्यांमध्ये जम्मू विद्यापीठाने मुंबई विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. मुंबई विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी बाद १२४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल जम्मू विद्यापीठाने ६ गड्यांच्या मोबदल्यात १८.३ षटकांत हे आव्हान पार केले. जम्मूच्या दीपक कुमारने ५८ धावा केल्या. या संघाकडून नाबाद

४३ धावा करणारा व २ बळी घेणारा राजेश मल्होत्रा सामनावीर ठरला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यातील सामना पुणे विद्यापीठाने ३७ धावांनी जिंकला. पुणे विद्यापीठाचा संघ प्रथम फलंदाजी करताना जळगावच्या शशिकांत शिरसाटच्या हॅट्‌ट्रिकमुळे १५.५ षटकांत ८५ धावांवर आटोपला. तेव्हा हा सामना जळगावच्या बाजूने झुकला होता. तथापि, पुणे विद्यापीठाच्या सचिन सुर्वे विनोद नरके मोनिष गायकवाड या गोलंदाजांनी बळी घेतल्यामुळे जळगावचा संघ अवघ्या ४८ धावांतच तंबूत परतला.

**क्रीडा वृत्त**

पुणे संघाकडून सर्वाधिक २२ धावा काढणारा दिनेश वाल्मीकी सामनावीर ठरला.

तत्पूर्वी, सकाळच्या सत्रात रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठावर ६९ धावांनी विजय मिळविला. रोहटक संघाच्या ११८ धावांचा पाठलाग करताना राहुरीचा संघ अवघ्या ४९ धावांत गारद झाला. या सामन्यात ११ धावांसह ३ धावांत ५ बळी घेणारा रोहटकचा नरेंद्र कुमार सामनावीर ठरला.

चंदीगढच्या पंजाब विद्यापीठाने नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा ७ गडी राखून पराभव केला. नागपूरचे १०६ धावांचे आव्हान पंजाब विद्यापीठाने १४.४ षटकांत पूर्ण करताना ११० धावा केल्या. पंजाब विद्यापीठाच्या सूर्यकांत यांनी २.३ षटकांत १४ धावा देत ४ बळी घेताना स्पर्धेतील पहिली हॅट्‌ट्रिक नोंदविली, हे या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले. सूर्यकांतच सामनावीर ठरला. गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाने जम्मू केंद्रीय विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. अखेरच्या चेंडूपर्यंत अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या या सामन्यात जम्मू विद्यापीठाच्या १४७ धावांचे आव्हान गोरखपूर संघाने ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. गोरखपूरकडून ३६ धावा करून विजयात महत्त्वाची कामगिरी करणारासुरेंद्र यादव सामनावीर ठरला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2019
तरुण भारत

# जामिया, जम्मू, पुणे विद्यापीठांची विजयी सलामी

## १७ वी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक टी - २० क्रिकेट स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या १७ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक स्पर्धेत मंगळवारी पहिल्या दिवशीच्या सामन्यांमध्ये नवी दिल्लीतील जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, जम्मू विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक, पंजाब विद्यापीठ, चंदीगढ व दीनदयाल उपाध्याय विद्यापीठ, गोरखपूर संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर मात करून विजयी सलामी दिली.

नवी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाने पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियानावर मात केली. प्रथम फलंदाजी करताना जामिया संघाने २० षटकांत ५ बाद २३२ धावांचा डोंगर रचला. प्रत्युत्तरादाखल खेळताना लुधियानाचा संघ अवघ्या १३६ धावांत गुंडाळला. यामुळे जामिया संघाने लुधियाना संघावर त्यांनी ९६ धावांनी मात केली.

दुपारच्या सत्रात जम्मू विद्यापीठाने मुंबई विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. यामध्ये मुंबई विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी बाद १२४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल जम्मू विद्यापीठाने ६ गड्यांच्या मोबदल्यात १८.३ षटकांत हे आव्हान गाठले. या सामन्यात नाबाद ४३ धावा करणारा व २ बळी घेणारा राजेश मल्होत्रा सामनावीर ठरला. यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विरुद्ध जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात सामना खेळविण्यात आला. हा सामना पुणे विद्यापीठाने ३७ धावांनी जिंकला. पुणे विद्यापीठाचा संघ प्रथम फलंदाजी करताना जळगावच्या शशिकांत शिरसाटच्या हॅटट्रीकमुळे १५.५ षटकांत ८५ धावांवर आटोपला. पुणे संघाकडून सर्वाधिक २२ धावा काढणारा दिनेश वाल्मिकी सामनावीर ठरला.



सकाळच्या सत्रात रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठावर ६९ धावांनी विजय मिळविला. रोहटक संघाच्या ११८ धावांचा पाठलाग करताना राहुरीचा संघ अवघ्या ४९ धावांत गारद झाला. या सामन्यात ११ धावांसह ३ धावांत ५ बळी घेणारा रोहटकचा नरेंद्र कुमार सामनावीर ठरला. यानंतरच्या सामन्यात चंदीगढच्या पंजाब विद्यापीठाने नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा ७ गडी राखून पराभव केला. नागपूरचे १०६ धावांचे आव्हान पंजाब विद्यापीठाने १४.४ षटकांत पूर्ण करताना ११० धावा केल्या. पंजाबच्या सूर्यकांत यांनी २.३ षटकांत १४ धावा देत ४ बळी घेताना स्पर्धेतील पहिली हॅटट्रीक नोंदविली, हे या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले. सूर्यकांतच सामनावीर ठरला. तर गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाने जम्मू केंद्रीय विद्यापीठावर ४ गडी राखून मात केली. अखेरच्या चेंडूपर्यंत अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या या सामन्यात जम्मू विद्यापीठाच्या १४७ धावांचे आव्हान गोरखपूर संघाने ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. गोरखपूरकडून ३६ धावा करणारा सुरेंद्र यादव सामनावीर ठरला.

### आजचे सामने

**सकाळचे सत्र (सकाळी ८.३० वा.)**

१) पंजाब विद्यापीठ, चंदिगढ वि. महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक
२) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वि. केंद्रीय विद्यापीठ, जम्मू
३) दीन दयाल उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर वि. लाला लजपतराय पशुविज्ञान विद्यापीठ, हिस्सार

**दुपारचे सत्र (दुपारी १ वा.)**

१) जामिया मिलीया इस्लामिया विद्यापीठ, दिल्ली वि. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२) जम्मू विद्यापीठ, जम्मू वि. महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर
३) हिमाचल प्रदेश विद्यापीठ, सिमला वि. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी